Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College

## of Arts, Science and Commerce, Baramati

(Empowered Autonomous)

# DEPARTMENT OF MARATHI

(Faculty of Arts)

**CBCS Syllabus**

**T.Y.B.A. (Marathi) Semester -VI**

**For Department of Marathi**

**Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern) NEP 1.0**

**(As Per NEP 2020)**

**To be implemented from Academic Year 2025-2026**

# Title of the Programme: B.A. (Marathi )

## Preamble

AES's Tuljaram Chaturchand College has made the decision to change the syllabus of across various faculties from June, 2023 by incorporating the guidelines and provisions outlined in the National Education Policy (NEP), 2020. The NEP envisions making education more holistic and effective and to lay emphasis on the integration of general (academic) education, vocational education and experiential learning. The NEP introduces holistic and multidisciplinary education that would help to develop intellectual, scientific, social, physical, emotional, ethical and moral capacities of the students. The NEP 2020 envisages flexible curricular structures and learning based outcome approach for the development of the students. By establishing a nationally accepted and internationally comparable credit structure and courses framework, the NEP 2020 aims to promote educational excellence, facilitate seamless academic mobility, and enhance the global competitiveness of Indian students. It fosters a system where educational achievements can be recognized and valued not only within the country but also in the international arena, expanding opportunities and opening doors for students to pursue their aspirations on a global scale.

In response to the rapid advancements in Arts the evolving approaches in various domains of Marathi and related subjects, the Board of Studies in Marathi at Tuljaram Chaturchand College, Baramati - Pune, has developed the curriculum for the first semester of F.Y.B.A. Marathi , which goes beyond traditional academic boundaries. The syllabus is aligned with the NEP 2020 guidelines to ensure that students receive an education that prepares them for the challenges and opportunities of the 21st century. This syllabus has been designed under the framework of the Choice Based Credit System (CBCS), taking into consideration the guidelines set forth by the National Education Policy (NEP) 2020, LOCF (UGC), NCrF, NHEQF, Prof. R.D. Kulkarni's Report, Government of Maharashtra's General Resolution dated 20th April and 16th May 2023, and the Circular issued by SPPU, Pune on 31st May 2023.

# पदवी व पदव्युत्तर मराठी : ठळक वैशिष्ट्ये

भाषा, साहित्य व विविध कलांच्या माध्यमातून होणारे विविध आविष्कार यांचा अभ्यास करणारी विद्या शाखा म्हणून कला शाखा ओळखली जाते. मराठी विषयाची पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी जीवन जगण्यासाठी विविध प्रकारची कौशल्ये अवगत करू शकेल. साहित्य आणि भाषेच्या ज्ञानामुळे विद्यार्थ्याला करिअरच्या विविध वाटा सुलभ होतील. भाषा व साहित्याच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची जीवनदृष्टी विकसित होईल व त्याला जीवन जगण्यास बळ मिळेल. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. असा विद्यार्थी एक समर्थ, सुसंस्कृत व भाषासंपन्न नागरिक बनू शकेल. निरामय समाजनिर्मितीसाठी हे महत्वाचे आहे. सध्याच्या काळात समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी - गुणवत्तापूर्ण व प्रगत जीवन जगता येण्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक, नैतिकमूल्यांचे अधिष्ठान असणे व ज्ञानवृद्धीसाठी नाविण्यपूर्ण व कौशल्याधिष्टित अभ्यासक्रम देणे हाच एकमेव मार्ग आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 च्या निर्देशानुसार तर भाषाभ्यासाची नवनवीन तंत्रे विद्यार्थी आत्मसात करतीलच. तसेच प्रसार माध्यमातील विविध सर्जनशील संधी प्राप्त करण्यास विद्यार्थ्यांना मदत होईल. साहित्याची भाषा, व्यवहाराची भाषा आणि शास्त्रीय वाङ्मयाची  भाषा यातील फरकही विद्यार्थ्यांना समजेल. त्यांचे जीवनाकडे पाहण्याचे परिप्रेक्ष्य विस्तारेल. निवेदक, सूत्रसंचालक, मुलाखतकार, जनसंपर्क अधिकारी, पटकथा लेखक, मुद्रित शोधक, संपादक, वार्ताहर, स्तंभलेखक, माध्यम संवादक, प्रकल्प लेखक, अनुवादक, भाषांतरकार, प्रकाशक, लेखक, नाटककार, अशा भाषा व साहित्याशी संबंधित असंख्य संधी विद्यार्थ्यांना खुणावत आहेत. त्या सदर अभ्यासक्रमातून उपलब्ध होतील, त्या दृष्टीने पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात मूलभूत बदल करण्यात आलेले आहेत. मराठी भाषेचे सर्जनशील उपयोजन, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक मराठीचे व्याकरण, मराठी भाषेची विविध कौशल्ये, मराठी भाषेचे संगणकीय उपयोजन, आधुनिक व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी लेखन, व्यावसायिक व माहितीपर लेखन, भाषांतर, रूपांतर, अनुवाद, वाङ्मयव्यवहार व प्रकाशन व्यवसाय, शब्दांकन इ. विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे. साहित्य आणि भाषेच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांच्या अधिष्ठान अभ्यासाचा पाया पक्का होईल व विद्यार्थी साहित्य आणि समाजाच्या सहसंबंधाचे आकलन करू लागेल. त्यातून त्यांची समाजाकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी विकसित होईल.

साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा, लेखक कवींची व्यक्तित्वे, साहित्यकृती, साहित्यिक, साहित्याची वैशिष्ट्ये, भारतीय साहित्य विचाराचा परिचय, भाषाविज्ञान, साहित्यकृतींचा संहितानिष्ठ अभ्यास, समीक्षा विचार व साहित्य संशोधन, वाङ्मयप्रकाराची संकल्पना, ग्रामीण व दलित साहित्य प्रवाह, स्त्रीवादी साहित्य प्रवाह, आदिवासी साहित्य प्रवाह, प्राचीन व अर्वाचीन विशेष लेखकाचा अभ्यास, साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास, साहित्याचे आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन, पदवी पातळीवरील संशोधन, व्यावहारिक व उपयोजित मराठी, प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये, समकालीन समाज इ. विषयांशी विद्यार्थी परिचित होईल. भाषेचे विविध व्यवहार आणि साहित्याच्या संदर्भातील भाषा व्यवहार याविषयी विद्यार्थ्यांची आकलनाची क्षमता निश्चितच वाढेल. लेखन- संपादन, भाषांतर- लेखन, रूपांतर, जाहिरात लेखन, पटकथा लेखन यासंबंधीच्या लेखन प्रकारांत विद्यार्थी पारंगत होईल . वक्तृत्व कला, संभाषण कौशल्ये, प्रासंगिक लेखन या प्रकाराबद्दल चे ज्ञान विद्यार्थी अवगत करतील.

मानवाने निर्माण केलेल्या भाषा, विविध बोलींचा अभ्यास त्यातील संदेश व्यवहार हे मराठी भाषेचे अभ्यासक्षेत्र आहे. मानवी मनाचा आणि प्रतिभेचा कल्पकतापूर्ण आविष्कार तसेच नीतीमूल्यांचा अभ्यास, वाङ्मयीन मूल्ये आणि जीवन मूल्यांचा अभ्यास, माणसाच्या नैतिक व सौंदर्य मूल्यांविषयीचा अभ्यास विद्यार्थी करू लागेल, साहित्य, चित्रकला, वास्तुकला व ललित कला तसेच नाट्य, संगीत, नृत्य, चित्रपट या प्रयोगाधिष्ठित कला जगभरातील मानवी संस्कृतीचा पोत जाणून घेणाऱ्या कला आहेत, या कलांचा विशेष अभ्यास करण्याची क्षमता विद्यार्थी मिळवू शकेल. मराठी भाषेच्या अभ्यासाने विद्यार्थ्यांची जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित होईल. पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी अधिक स्पष्ट, अभिरुची संपन्न आणि संस्कारित व जबाबदार नागरिक बनेल, असा विश्वास वाटतो.

## Programme Specific Outcomes (PSOs)

### Program Specific Outcomes

### (PSOs). B.A. Marathi

**PSO1**. मराठी भाषा आणि वाङ्मयाचे प्रगत ज्ञान होईल.

**PSO2** वाङ्मयीन प्रश्नांसंबंधी विचार करण्याची क्षमता विकसित होईल.

**PSO3.** वाङ्मयाची आणि जीवनाची जाणीव प्रौढ होईल.विद्यार्थ्यांच्या लेखन गुणांना उत्तेजन मिळेल.

**PSO4.** विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्याच्या वापरासंबंधीची क्षमता विकसित होईल.

**PSO5.** साहित्याच्या अभ्यासाने चिकित्सक अभ्यासाची क्षमता वाढीस लागेल.

**PSO6.** समस्या निवारण व प्रश्नांबद्दल समीक्षणात्मक दृष्टी विकसित होईल.

**PSO7.** भाषेचे विविध व्यवहार आणि साहित्याच्या संदर्भातील भाषा व्यवहार याविषयी आकलन क्षमतेत वाढ होईल.

**PSO8.** आधुनिक भाषा अभ्यासाच्या साधनांची माहिती होईल. विविध प्रसारमाध्यमांमध्ये उपलब्ध असलेल्या उद्योग-व्यवसायाच्या संधी ज्ञात होतील.

**PSO9.** निरीक्षण कौशल्ये व आकलन क्षमतेची कौशल्ये विकसित होतील .

**PSO10.** साहित्याभ्यासाने जबाबदार नागरिकत्वाची जाणीव विकसित होईल व नैतिक तसेच सामाजिक भान असलेला जाणीवेचा युवक तयार होईल.

**PSO11.** पर्यावरण जाणीव व पर्यावरण संवर्धन मूल्यांची ज्ञान क्षमता विकसित होईल.

**PSO12.** व्यक्तीच्या वैयक्तिक व सामाजिक, सांस्कृतिक विकासात साहित्याचे स्थान मोलाचे आहे. याबद्दलची समज वाढीस लागेल.

**Anekant Education Society's**

# Tuljaram Chaturchand College

## of Arts, Science and Commerce, Baramati

(Empowered Autonomous)

## Board of Studies (BOS) in Marathi

**From 2025-26 to 2027-28**

| Sr. No | Name of Attendees | Designation |
|---|---|---|
| 1 | Prof. Dr. Seema Naik-Gosavi | Chairman |
| 2. | Prof. Dr. Nitish Sawant | Internal Member |
| 3. | Dr. Mukta Ambhere | Internal Member |
| 4. | Dr. Sunil Khamgal | Internal Member |
| 5. | Dr. Rajkumar Tarade | Internal Member |
| 6. | Dr. Sushama Jadhav | Internal Member |
| 7. | Dr. Tukaram Rongate | External Member Vice Chancellor Nominee |
| 8. | Prof. Dr. Devanand Sontakke | External Member for other University |
| 9. | Prof. Nitin Talpade | External Member for other University |
| 10. | Kumar Devkate | Representative From industry/corporate sector |
| 11 | Shri. Anil Kengar | Meritorious Alumni |
| 12 | Vaishanivi Kshirsagar | PG Student |
| 13 | Vaishanavi Bhise | UG Student |

## Course & Credit Structure for T.Y.B.A.Marathi (2023 Pattern as per NEP-2020)

| Sem | Course Type | Course Code | Course Title | Theory / Practical | Credi ts |
|---|---|---|---|---|---|
| V | Major Mandatory | MAR-301-MJM | साहित्यविचार | Theory | 04 |
| | Major Mandatory | MAR -302-MJM | मराठीचा भाषिक अभ्यास (ऐतिहासिक) | Theory | 04 |
| | Major Mandatory | MAR -303-MJM | मराठी साहित्य : व्यक्तिचित्र | Theory | 02 |
| | Major Elective (MJE) | MAR -304-MJE(A) | मराठी साहित्य : ललितगद्य | Theory (Any One) | 04 |
| | Major Elective (MJE) | MAR -304-MJE(B) | बालसाहित्य | | |
| | Minor | MAR -311-MN | मराठी साहित्य : विज्ञान कथा | Theory | 04 |
| | Vocational Skill Course (VSC) | MAR -321-VSC | श्राव्य माध्यमांसाठी वाचन कौशल्ये | Theory | 02 |
| | Community Engagement Project (CEP) / Field Project | MAR -335-FP | Field Project | Practical | 02 |
| | | | | **Total Credits Semester-V** | **22** |
| VI | Major Mandatory | MAR-351-MJM | साहित्यविचार | Theory | 04 |
| | Major Mandatory | MAR -352-MJM | मराठीचा भाषिक अभ्यास (ऐतिहासिक) | Theory | 04 |
| | Major Mandatory | MAR -353-MJM | मराठी साहित्य : सामाजिक लेखन | Theory | 02 |
| | Major Elective (MJE) | MAR -354-MJE(A) | मराठी साहित्य : प्रवासवर्णन | Theory (Any One) | 04 |
| | Major Elective (MJE) | MAR -354-MJE(B) | मराठी साहित्य : बालकथा | | |
| | Minor | MAR -361-MN | मराठी साहित्य : विज्ञान कादंबरी | Theory | 04 |
| | On Job Training (OJT) | MAR -385-OJT | On Job Training (OJT) | Practical | 04 |
| | | | | **Total Credits Semester-VI** | **22** |
| | | | | **Total Credits Semester-V + VI** | **44** |

# CBCS Syllabus as per NEP 2020 forT.Y. B.A. Marathi (2023 Pattern)

| | | |
|---|---|---|
| **Name of the Programme** | : | B.A. |
| **Program Code** | : | UAMR |
| **Class** | : | T.Y. B.A. |
| **Semester** | : | VI |
| **Course Type** | : | Major Mandatory (Theory) |
| **Course Name** | : | साहित्यविचार |
| **Course Code** | : | MAR-351-MJM |
| **No. of Lectures** | : | 60 |
| **No. of Credits** | : | 4 |

## Course Objectives:

१. साहित्याचे स्वरूप समजून घेणे.

२. साहित्याच्या प्रयोजनाचा परिचय करून घेणे.

३. भारतीय साहित्यविचार, स्वरूप संकल्पनाचे आकलन करून घेणे.

४. साहित्यनिर्मितीची प्रक्रिया समजावून घेणे.

५. साहित्याची भाषा, तिचे वेगळेपण लक्षात घेणे.

६. साहित्याची आस्वाद प्रक्रिया समजून घेणे.

७. साहित्यिक अभिरुचीचे स्वरूप समजून घेणे

## Course Outcomes:

CO1. विद्यार्थ्यांची साहित्याचा आस्वाद घेण्याची क्षमता विकसित होईल.

CO2. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.

CO3. लेखकाची सामाजिकता समाज सापेक्ष असते हे समजेल.

CO4. भाषेच्या समाजनिष्ठ जाणीवेचा सहसंबंध विद्यार्थ्यांच्या लक्षात येईल.

CO5. विद्यार्थ्यांना साहित्यप्रकारांच्या संकल्पनेचा परिचय होईल.

CO6. बांधिलकीची संकल्पना विद्यार्थ्यांना समजेल.

CO7. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, व वाङ्मयीन पर्यावरणाचा अभिरुचीवर होणारा परिणाम विद्यार्थ्यांना ज्ञात होईल.

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **साहित्याचा आस्वाद**<br>● आस्वाद म्हणजे काय ?<br>● आस्वाद प्रक्रिया<br>● आस्वादकाला आवश्यक असणारे गुण<br>● आस्वादातील अडथळे | 60 |
| २ | **साहित्याची सामाजिकता**<br>● साहित्य आणि समाज यांचे परस्पर संबंध<br>● लेखकाची सामाजिकता<br>● भाषेची सामाजिकता<br>● वाचकाची सामाजिकता | |
| ३ | **लेखकाच्या अनुभवाची सामाजिकता**<br>● कलात्मक अनुभवातील सामाजिकता<br>● साहित्यातील सामाजिकता व वैश्विकता<br>● बांधिलकीची संकल्पना व साहित्यिकाची बांधिलकी | |
| ४ | **साहित्यिक अभिरुची**<br>● अभिरुची म्हणजे काय ?<br>● अभिरुची आणि सौंदर्यदृष्टी<br>● अभिरुची आणि औचित्य | |
| ५ | **अभिरुची भिन्नतेची कारणे**<br>● वाङ्मयीन अभिरुची नियंत्रित करणारे घटक<br>● सांस्कृतिक पर्यावरण<br>● आर्थिक पर्यावरण<br>● वाङ्मयीन पर्यावरण | |
| ६ | **साहित्य प्रकाराची संकल्पना व स्वरूप**<br>● साहित्याच्या वर्गीकरणाची शक्याशक्यता<br>● साहित्याच्या वर्गीकरणाची आवश्यकता<br>● साहित्याच्या वर्गीकरणाची तत्वे<br>● माध्यम भिन्नता<br>● प्रस्तुतीकरणाची पद्धती<br>● प्रस्तुतीकरणाचा दृष्टिकोन<br>● प्रस्तुतीकरणाचा काळ<br>● साहित्याचे प्रकार- कथा, कादंबरी,नाटक, कविता इ. | |

**संदर्भ ग्रंथ -**

१. साहित्य विचार - डॉ. अ. वा. कुलकर्णी
२. साहित्य विचार (संपा) - डॉ. द दि पुंडे, डॉ. स्नेहल तावरे
३. काव्यशास्त्र प्रदीप - डॉ. स.रा. गाडगीळ
४. वाङ्मयीन शैली आणि तंत्र - म.द. हातकणंगलेकर
५. साहित्य व सामाजिक संदर्भ - रा.ग. जाधव
६. साहित्य व समाज - संपा. डॉ. विलास खोले
७. साहित्य व सामाजिक संदर्भ - डॉ. अंजली सोमण
८. कविता आणि प्रतिभा - सुधीर रसाळ
९. सृजनात्मक भूषणे - डॉ. आनंद पाटील
१०. काव्याची भूषणे - प्रा. म. वा. धोंड
११. साहित्यशास्त्र स्वरूप व समस्या - डॉ. वसंत पाटणकर
१२. आधुनिकमराठी साहित्य व सामाजिकता -संपा. डॉ. विद्यागौरी टिळक, डॉ. मृणालिनी शहा
१३. साहित्य मीमांसा व समाजदर्शन - डॉ. स.रा. गाडगीळ
१४. भारतीय साहित्य विचार - ग.त्र्य. देशपांडे
१५. भारतीय साहित्य विचार - डॉ. लीला गोविलकर
१६. साहित्य विचार - डॉ. च.वि. जोशी, डॉ. वेदश्री थिगळे
१७. पाश्चात्य साहित्य विचार - बालशंकर देशपांडे
१८. साहित्य स्वरूप आणि समीक्षा - वा.ल. कुलकर्णी
१९. साहित्य विचार - भालचंद्र खांडेकर
२०. भारतीय साहित्यविचार - डॉ. तुषार चांदवडकर
२१. साहित्याचे तत्वज्ञान - वि.ना. ढवळे
२२. साहित्याची भाषा - डॉ. भालचंद्र नेमाडे
२३. भाषा आणि जीवन - संपा. आनंद काटीकर

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2020)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: **TYBA** (Sem VI) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: MAR-351-MJM

Tittle of **Course :** साहित्यविचार

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | Programme Outcomes (POs) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Course Outcomes | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 2 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 6 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 3 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 3 | 1 |
| CO 8 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

## Justification for the mapping

**PO1: Critical and Creative Thinking:**

CO6 : विद्यार्थी साहित्य आणि समाजाच्या सह्सबंधाचे आकलन करू लागेल. त्यातून स्वजाणीव विकसित होईल. साहित्याच्या अभ्यासाने समाजाकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टी विकसित होईल.

**PO2: Communication Skill:**

CO4: साहित्याच्या व भाषेच्या अभ्यासाने परिणामकारक संवाद कौशल्ये निर्माण होईल. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल. साहित्याचे प्रयोजन साहित्याची निर्मिती यांच्या अभ्यासामुळे साहित्याच्या भाषेचे वेगळेपण लक्षात येईल.

**PO3: Multicultural Competence:**

CO2: साहित्य आणि समाजाचा परस्पर सबंध समजल्यामुळे व्यवसायातील समजाचे स्थान लक्षात येईल.

**PO4: Research Skills:**

CO1: विविध साहित्य प्रकारांचा आस्वाद घेण्याची क्षमता वाढीस लागेल व आस्वादन कौशल्ये विकसित होईल. साहित्य संशोधची रुची वाढेल.

**PO5: Environmental awareness:**

CO7: वाङ्मयीन सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक, पर्यावरणाचा एक स्वतंत्र अभिरुची विकसित होण्यास मदत होईल. त्यातून पर्यावरण विषयक सजग जाणीव वाढीस लागेल.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO2: साहित्याच्या अभ्यासाने विद्यार्थी जीवनात जीवन मूल्यांचे संस्कार होतील व जवाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण होईल.

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO6: विद्यार्थी साहित्य आणि समाजाच्या सहसबंधाचे आकलन करू लागेल. त्यातून स्वजाणीव विकसित होईल.

**PO8: Value inculcation:**

CO5: साहित्य प्रकारांच्या सिद्धांता बद्दलच्या संकल्पना साहित्य भाषेच्या माध्यमांमधील भिन्नता, लेखकांच्या अनुभव घटकांचे व्यवस्थापन यातील सेद्रियत्व व साहित्यातील सोंदर्याची संकल्पना समजण्यास मदत होईल.

**PO9: Digital and technological skills:**

CO7: आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने विद्यार्थी नवनवीन साहित्य प्रकारांचा आस्वाद घेऊ लागेल

**PO10: Community Engagement and Service:**

CO6: साहित्य अभ्यासामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजभान सेवाभाव वाढीस लागेल

*************************************************************************

## CBCS Syllabus as per NEP 2020 for T.Y.B.A Marathi (2023 Pattern)

Name of the Programme : B.A
Programme Code- : UAMR
Class : T.Y.B.A.
Semester : VI
Course Type : (Theory)
Course Name : मराठीचा भाषिक अभ्यास : ऐतिहासिक
Course Code : MAR-**352-MJM**
No. of Lecturer : 60
No. of Credit : 04

## Course Objectives:

१. भाषेचे स्वरूप, कार्य, भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व जाणून घेणे.
२. भाषेच्या अभ्यासाची अंगे जाणून घेणे.
३. भाषाभ्यासाच्या पद्धती, वेगळेपण आणि महत्त्व जाणून घेणे.
४. स्वननिर्मिती प्रक्रिया समजावून घेणे.
५. स्वनिम संकल्पना व मराठीच्या स्वनिम व्यवस्थेची माहिती घेणे.
६. ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धतीचे स्वरूप व महत्त्व लक्षात घेणे.
७. भाषाकुलाची संकल्पना जाणून घेऊन मराठीच्या उपत्तीचा आढावा घेणे.

## Course Outcome:

**CO1**. भाषाविज्ञानातील वाक्यविन्यास आणि अर्थविन्यास संकल्पनेचा परिचय होईल
CO2. स्वन विज्ञान, स्वन निर्मिती लक्षात येईल.
**CO3.** भाषाकुलाची संकल्पना समजेल.
**CO4.** वांगेद्रियाची रचना व कार्य समजेल.
**CO5.** स्वनिम संकल्पना व मराठीची स्वनिम व्यवस्था याविषयी माहिती होईल.
**CO6.** रुपिम संकल्पना आणि मराठीच्या रुपिम व्यवस्थेची माहिती होईल.
**CO7.** मराठी भाषेची उत्पत्ती व विकास याचे आकलन होईल.

**Topics and learning points**

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **स्वन विज्ञान आणि स्वननिर्मिती:**<br>१.१. वागेंद्रियाची रचना व कार्य<br>१.२. स्वरांचे स्वरूप<br>१.3. लक्षणे<br>१.४. प्रकार,<br>१.५. व्यंजनांचे स्वरूप १.६. लक्षणे | 60 |
| २ | **स्वनिम विचार:**<br>२.१. स्वन - स्वनिम - स्वनांतर संकल्पना<br>२.२. स्वनिम निश्चितीची तत्वे<br>२.३. विनियोग संकल्पनेचा स्थूल परिचय<br>२.४. मराठी स्वनिम व्यवस्थेची रूपरेषा<br>२.५. स्वरस्वनिम<br>२.६. व्यंजनस्वनिम<br>२.७. अर्धस्वर स्वनिम यांचे वर्गीकरण | |
| ३ | **रूपिम विचार :**<br>३.१. रूपिमाचे तत्व,<br>३.२. रुपिका - रुपीकांतर संकल्पना<br>३.३. रूपिमाचे प्रकार - आशय बोधक रूपिम, कार्यकर रूपिम | |
| ४ | **वाक्य विचार** –<br>४.१. वाक्यविन्यास संकल्पना<br>४.२. मराठीतील वाक्यविन्यास व्यवस्था<br>४.३. वाक्याचे घटक | |
| ५ | **अर्थ विचार स्वरूप :-**<br>५.१. अर्थ परिवर्तनाची संकल्पना आणि स्वरूप<br>५.२. विविध प्रकार | |
| ६ | **अर्थ परिवर्तनाचे घटक :-**<br>६.१ अर्थ परिवर्तनाचे विविध घटक | |

**संदर्भग्रंथ -**

१. वर्णनात्मक भाषाविज्ञान स्वरूप आणि पद्धती - संपा. डॉ. काळे, डॉ. सोमण
२. भाषाविज्ञान परिचय : डॉ. मालशे, डॉ. सोमण
३. वर्णनात्मक भाषाविज्ञान - डॉ. लीला गोविलकर
४. मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान- डॉ. महेंद्र कदम
५. मराठीचा भाषिक अभ्यास - डॉ. मु. श्री. कानडे
६. सुलभ भाषाविज्ञान : डॉ.द.दि. पुंडे
७. सामाजिक भाषाविज्ञान - संपा. जयश्री पाटणकर
८. ऐतिहासिक भाषाशास्त्र - र.रा. गोसावी
९. भाषाविज्ञान वर्णनात्मक व ऐतिहासिक - संपा. डॉ. मालशे, इनामदार, सोमण

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)
(As Per NEP 2020)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: T.Y.**B.A.** (**SEM** VI) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: MAR-**352-MJM**

Tittle of **Course: मराठीचा भाषिक अभ्यास: ऐतिहासिक**

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 2 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 |
| CO 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | 1 | 3 |

# Justification for the mapping

**PO1: Critical and Creative Thinking:**

CO5: मराठीच्या स्वन, स्वनिम, स्वनांत्तर संकल्पनेमुळे भाषा निर्मिती प्रक्रिया व भाषेला अर्थ कधी प्राप्त होतो व तसेच विविध भाषांचा अभ्यास लक्षात येतो.

**PO2: Communication Skill:**

CO4 : मानवी वागेंद्रियाच्या रचनेमुळे भाषानिर्मिती कशी होते हे समजेल आणि मानवी मुखातील स्वरयंत्र, अलिजिव्हा, नासिक्यारंजन, कंठ्ताळू इत्यादी प्रत्येक अवयवाची माहिती होईल.

**PO3: Multicultural Competence:**

CO1: भाषाविज्ञान म्हणजेच भाषेचे अध्ययन करणारी विज्ञान शाखा आहे. इथे वाक्याविन्यास आणि अर्थविन्यास या संकल्पनेचा परिचय होईल.

**PO4: Research Skills:**

CO2: स्वन विज्ञान आणि स्वन निर्मिती या संज्ञा लक्षात घेऊन अभ्यास केल्यास विद्यार्थ्यांची मुलभूत संशोधनात्मक दृष्टी विकसित होईल.

**PO5: Environmental awareness:**

CO7: मराठी भाषेची उत्पती कधी झाली व भाषेचे कुल, निर्मिती प्रक्रिया कशी झाली ते समजून येईल, व मराठी भाषा उपबोली प्रदेशानुसार ती कशी बोलली जाते याचा सखोल अभ्यास होऊन मराठी भाषेचे योगदान समजेल.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO3: भाषाकुलाची संकल्पना सामाजिक, सांस्कृतिक, आणि बौद्धिक परिप्रेक्ष्यातून विद्यार्थ्यांना त्याचे महत्त्व समजेल व विद्यार्थ्यांना साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वातावरणासह सक्षम बनवेल.

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO7: मराठी भाषेची उत्पती कधी झाली व भाषेचे कुल, निर्मिती प्रक्रिया कशी झाली ते समजून येईल, व मराठी भाषा उपबोली प्रदेशानुसार कळेल आणि मराठी भाषेचे योगदान समजेल.

**PO8: Value inculcation:**

CO6: रुपिम म्हणजे उच्चारणातील सर्वात लहान असे भाषिक रूप असते. अर्थाच्या दृष्टीने वाक्याचे विभाजन होऊ शकत नाही हे विद्यार्थ्यांना समजेल व रुपिम गटवाचक किंवा समूह वाचक संज्ञा असल्याचे समजून येईल. तसेच भाषांतर, अनुवाद भाषेचा कसा करायचा ते समजेल.

**PO9: Digital and technological skills:**

**CO4.** अत्याधुनिक साधनाद्वारे वांगेद्रियाची रचना व कार्य विद्यार्थ्यांना समजेल.

**PO10: Community Engagement and Service:**

**CO7.** विद्यार्थ्यांना मराठी भाषेची उत्पत्ती व विकास याचे आकलन होईल.

---

## CBCS Syllabus as per NEP 2020 for T.Y.B.A Marathi (2023 Pattern)

Name of the Programme : B.A
Programme Code- : UAMAR
Class : T.Y. B. A.
Semester : VI
Course Type : Major Mandatory (Theory)
Course Name : मराठी साहित्य : सामाजिक लेखन
Course Code : MAR-353-MJM
No. of Lecturer : 30
No. of Credit : 02

## Course Objective

१. सामाजिकतेचे स्वरूप व साहित्याचे महत्त्व समजून घेणे.
२. सामाजिक, शारीरिक, मानसिक, भावनिक आणि बौद्धिक गुणधर्मांचे विश्लेषण करणे.
३. सामाजिक दृष्टिकोन आत्मसात करणे.
४. समाज प्रबोधनाची परंपरा तपासणे.
५. सामजिक जीवनातील अनुभव, स्वभाव आणि विचारसरणी यांचा अभ्यास करणे.
६. लेखकाच्या साहित्याचे वैशिष्ट्ये समजावून देणे .
७. लेखकाच्या सौंदर्यशास्त्र, भाषाशैली, अलंकारिक वैशिष्ट्ये, आणि प्रभावी मांडणी यांचा अभ्यास करणे.

## Course Outcome

CO1 - विद्यार्थी सामाजिकतेचे स्वरूप व साहित्याचे महत्त्व समजून समजून घेतील.
CO2- सामाजिक, शारीरिक, मानसिक, भावनिक आणि बौद्धिक गुणधर्मांचे महत्त्व ओळखता येईल.
CO3- विद्यार्थ्यांना सामाजिक दृष्टिकोन विकसित होईल.
CO4 - समाज प्रबोधनाची परंपरा तपासत येईल.
CO5- सामजिक जीवनातील अनुभव, स्वभाव आणि विचारसरणी अभ्यास आत्मसात करता येईल.
CO6- लेखकाच्या साहित्याचे वैशिष्ट्ये समजावून विश्लेषण करता येईल.
CO7- लेखकाच्या सौंदर्यशास्त्र, भाषाशैली, अलंकारिक वैशिष्ट्ये, आणि प्रभावी मांडणी यांचा अभ्यास करता येईल.

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **सामाजिकता स्वरूप व संकल्पना**<br>१.१. सामाजिकता स्वरूप व संकल्पना<br>१.२. सामाज प्रबोधनाची परंपरा<br>१.३. सामाजिकता: वैशिष्ट्ये | 30 |
| २ | **नेमलेली कलाकृतीचा अभ्यास (निवडक लेख)**<br>२.१ 'सामाजिक विकासवेध' – डॉ. सुनीलकुमार लवटे | |
| ३ | **'सामाजिक विकासवेध' वाड्मयीन मूल्यमापन**<br>३.१. लेखकाचा संशोधकीय दृष्टिकोन<br>३.२. भाषाशैली<br>३.३. वैशिष्ट्ये | |

**संदर्भ ग्रंथ-**


१. 'सामाजिक विकासवेध' – डॉ. सुनीलकुमार लवटे

२. वाड्मयीन संज्ञा संकल्पना कोश – वसंत आबाजी डहाके

३. एकविसाव्या शतकातील सामाजिक प्रश्न- डॉ. सुनीलकुमार लवटे

४. चिंतनयात्रा - जनार्दन वाघमारे

५. साहित्य आणि अस्तित्वभान भाग-२ – दिलीप पुरुषोत्तम चित्रे

६. साहित्य आणि सामजिक संदर्भ – डॉ अंजली सोमण

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2020)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: T.Y.**B.A.** (**SEM** VI) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: MAR-353-MJM

Tittle of **Course:** मराठी साहित्य : सामाजिक लेखन

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 2 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 |
| CO 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | 1 | 3 |

## Justification for the mapping

**PO1: Critical and Creative Thinking:**

CO5: विद्यार्थ्यांनचा सामाजिक दृष्टिकोन समाज सुधारणा आणि ज्ञानाचा प्रसार करणाऱ्या परंपरेचा अभ्यास करतील.

**PO2: Communication Skill:**

CO4 : विद्यार्थ्यांना समाजाकडे योग्य, संवेदनशील आणि समजूतदार दृष्टीने पाहायला शिकणे.

**PO3: Multicultural Competence:**

CO1: विद्यार्थ्यांनी समाज म्हणजे काय, त्याची रचना, मूल्ये, परंपरा, विचारधारा इत्यादी गोष्टी समजून घ्याव्यात आणि त्याच वेळी साहित्य समाजाशी कसे जोडलेले आहे, समाजाचे प्रतिबिंब म्हणून साहित्याचे महत्त्व काय आहे, हे जाणून घ्यावे.

**PO4: Research Skills:**

CO2: समाजातील, शारीरिकदृष्ट्या, मनाच्या, भावना आणि बुद्धीच्या गुणांचे अभ्यास करून समजून घेता येईल.

**PO5: Environmental awareness:**

CO7: विद्यार्थ्यांना लेखकाचे जीवन, लिखाण वाङ्मयीन वातावरण हे समजून घेता येईल.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO3: विद्यार्थ्यांनी एखाद्या लेखकाच्या साहित्याचा सखोल अभ्यास करून त्यातील मुख्य विषय, शैली, भाषा, व्यक्तिरेखा, भावना, विचारसरणी आणि समाजदर्शन यांसारख्या वैशिष्ट्यांचे विश्लेषण व स्पष्टीकरण करावे. विद्यार्थ्यांना साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वातावरणासह सक्षम बनवेल.

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO7: लेखक आपले विचार आणि भावना व्यक्त करण्याची त्याची खास बोलण्याची किंवा लिहिण्याची पद्धत म्हणजे भाषाशैली.प्रदेशानुसार कळेल आणि मराठी भाषेचे योगदान समजेल.

**PO8: Value inculcation:**

CO6: विद्यार्थ्यांनी समाजातील लोकांचे दैनंदिन अनुभव**,** त्यांचा स्वभाव, वर्तन, जीवनपद्धती**,** तसेच त्यांची विचारसरणी यांचा सखोल विचारांचा प्रभाव पडतो.

**PO9: Digital and technological skills:**

**CO4.** समाजातील लोकांचे विचार, जीवनशैली, सण-उत्सव, नातेसंबंध आणि नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांना आधुनिक माध्यमातून समजेल.

**PO10: Community Engagement and Service:**

**CO7.** विद्यार्थ्यांनी लेखकाविषयी सखोल अभ्यास करून, विचारपूर्वक आणि पुराव्यांवर आधारित पद्धतीने लिहिणे म्हणजे संशोधकीय दृष्टिकोन**.**

## CBCS Syllabus as per NEP 2020 for TYBA Marathi (2023 Pattern)

| | |
|---|---|
| **Name of the Program** | : B.A. |
| **Program Code** | : UAMAR |
| **Class** | : T.Y.B.A. |
| **Semester** | : VI |
| **Course Type** | : Major Elective (Theory) |
| **Course Name** | : मराठी साहित्य : प्रवासवर्णन |
| **Course Code** | : MAR-354- MJE (A) |
| **No. of Lectures** | : 60 |
| **No. of Credits** | : 04 |

## Course Objectives:

१ ) 'प्रवासवर्णन' या वाङ्मय प्रकाराचे तात्त्विक विवेचन करणे.
२ ) 'प्रवासवर्णन' साहित्य प्रकाराची मूलतत्त्वे अभ्यासणे.
३ ) 'प्रवासवर्णन' साहित्यप्रकारातील वाटचालीचे स्थूल ज्ञान करून देणे.
४ ) 'चिंबोरेयुद्ध' या प्रवासवर्णनाचे वाङ्मयीन दृष्टिकोन समजाऊन देणे.
५) निवडलेल्या प्रवासवर्णनाचे मूल्यमापन आणि आस्वाद घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
६) निवडलेल्या प्रवासवर्णनाचे वेगळेपण समजावून देणे.
७) निवडलेल्या प्रवासवर्णनाचे वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा परिचय करून देणे.

## Course Outcomes:

CO1. आधुनिक मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रकारांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
CO2. विद्यार्थ्यांची वाङ्मयीन अभिरुची विकसित झाल्याने, साहित्यकृतीच्या गुणात्मक मूल्यांची जाणीव होईल.
CO3. विविध साहित्य प्रकारांच्या माध्यम भिन्नतेचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.
CO4. साहित्य प्रकारांचे पायाभूत मुलभूत प्रकार विद्यार्थ्यांना माहिती होतील.
CO5. मराठीतील प्रमुख साहित्य प्रकार विद्यार्थ्यांना ज्ञात होतील.
CO6. 'प्रवासवर्णन' साहित्य प्रकाराचे तात्त्विक अध्ययन विद्यार्थ्यांना करता येईल.
CO7. विद्यार्थ्यांची साहित्य प्रकारांचा तौलनिक अभ्यास करण्याची क्षमता विकसित होईल.

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **' ललित गद्य' या वाङ्मय प्रकाराची तात्विक विवेचन**<br>१.१ प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराचे स्वरूप व संकल्पना<br>१.२ प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराचे वेगळेपण | ६० |
| २ | **' प्रवासवर्णन' साहित्य प्रकार – मूलतत्त्वे**<br>२.१ प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराची प्रेरणा<br>२.२ प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराचे घटक<br>२.३ प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये | |
| ३ | **' प्रवासवर्णन' साहित्यप्रकार – वाटचाल**<br>२.१ ललित गद्याची वाटचाल | |
| ४ | **नेमलेल्या साहित्यकृतीचा अभ्यास : (प्रवासवर्णन)–**<br>४.१ 'तीन मुलांचे चार दिवस', आदर्श पाटील, विकास वाळके, श्रीकृष्ण शेवाळे | |
| ५ | **'तीन मुलांचे चार दिवस', या साहित्यकृतीचे वाङ्मयीन मूल्यमापन**<br>५.१ व्यक्तिरेखा<br>५.२ घटना- प्रसंग,<br>५.३ भाषासौदर्य<br>५.४ वातावरण | |
| ६ | **'तीन मुलांचे चार दिवस', या साहित्यकृतीचे वेगळेपण**<br>६.१ लेखकाचा दृष्टिकोन<br>६.२ 'तीन मुलांचे चार दिवस' प्रवासवर्णनाचे वाङ्मयीन वैशिष्ट्ये | |

**संदर्भग्रंथ-**

१. 'प्रवासपर्णनाचा प्रवास', मुकुंद वझे, देशमुख अँड कंपनी ,जून२०१६
२. 'प्रवासवर्णन' ,वसंत सावंत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
३. 'तीन मुलांचे चार दिवस', आदर्श पाटील, विकास वाळके, श्रीकृष्ण शेवाळे, साधना प्रकाशन पुणे.
४. 'मराठी प्रवासवर्णनांची वाटचाल' नीला पांढरे
५. 'प्रवासवर्णन :एक वाङ्मयप्रकार', वसंत सावंत, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
६. 'प्रदक्षिणा खंड पहिला', कुलकर्णी अनिरुद्ध अनंत (संपादक),कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पुनर्मुद्रण २००७
७. साहित्य सिद्धांत - स. गं. मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७२
८. 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास: १८०० ते १९६०',जोशी प्र. न.,स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, १९७७
९. 'साठोत्तरी प्रवासवर्णने वाटा आणि वळणे', वैशाली गुंजेकर, अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर २०२३
१०. ' मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा ', जाधव रा. ग., मराठी साहित्य परिषद पुणे, २०११

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)
(As Per NEP 2020)
**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class** :**T.Y.B.A. (SEM VI)** **Subject**: MARATHI

**Course Code**: MAR-354 - MJE (A) **Tittle of Course : मराठी साहित्य : प्रवासवर्णन**

**Course**: Major Elective (Theory)
**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 2 | **1** | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 4 |
| CO 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 6 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | 3 | 1 |
| CO 8 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |

## Justification for the mapping

**PO1: Critical and Creative Thinking:**

CO5: प्रवासवर्णनातून मानवी जीवन किती व्यापक पातळयांवर कार्यमग्न असते याचे भान येईल.

**PO2: Communication Skill:**

CO8 : प्रवासवर्णन साहित्याच्या अभ्यासाने विदयार्थी आपले जीवनानुभव लालित्यपूर्ण भाषेचा वापर करून व्यक्त करण्याचे कौशल्य आत्मसात करतील.

**PO 3: Multicultural Competence:**

CO 3: प्रवासवर्णनाच्या भाषेचे वैशिष्ट्ये आणि त्यातील विविधता समजुन घेतल्यामुळे आपल्याला विविध संस्कृती, परंपरा आणि समाजातील विविधतेचा आदर निर्माण होईल. या संदर्भात बहुसांस्कृतिक कौशल्याची महत्त्वपूर्ण भूमिका समजेल

**PO4: Research Skills:**

CO6: प्रवासवर्णन साहित्य प्रकारात साहित्याचा सूक्ष्म पातळीवर अभ्यास करण्याची संशोधनात्मक क्षमता विकसित होईल.

**PO5: Environmental awareness:**

CO7. विद्यार्थ्यांना प्रवासवर्णनातून पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे. याचे ज्ञान झाल्याने पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी वृक्षारोपण करतील.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO7: विद्यार्थ्यांमध्ये साहित्यप्रकाराचा तौलनिक अभ्यास कारण्याच्यी क्षमता विकसित झाल्यामुळे जटिल विचार प्रक्रिया करण्यात सक्षम होतील व त्याद्वारे जीवनातील विविध समस्या सोडवतील.

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO2. प्रवासवर्णनातून विविध जीवनानुभव व्यक्त होत असल्याने जीवनाकडे पाहण्याची दृष्टी व्यापक होत जाईल.

**.PO8:Value inculcation:**

CO1. निकोप समाजरचना करण्यासाठी मूल्य शिक्षणाची नितांत गरज असते या प्रवासवर्णनातून लेखामधून विद्यार्थी मूल्यशिक्षणाचे धड घेऊन जीवन कसे जगावे याची कला शिकेल.

**PO9: Digital and technological skills:**

CO7. माहिती तंत्रज्ञानाच्या साह्याने विद्यार्थ्यांनी ललित गद्याचे छोटे व्हिडिओ करायला शिकतील.

**PO10: Community Engagement and Service:**

CO4 समाजात संघ भावनेतून परिस्थितीनुरूप नवे बदल स्वीकारून काळाप्रमाणे जीवन जगण्याचे भान विद्यार्थ्यांना येईल.

# CBCS Syllabus as per NEP 2020 for TYBA Marathi (2023 Pattern)

| | |
|---|---|
| **Name of the Programme** | : B.A. |
| **Program Code** | : UAMAR |
| **Class** | : T.Y.B.A. |
| **Semester** | : VI |
| **Course Type** | : Major Elective (Theory) |
| **Course Name** | : मराठी साहित्य – बालकथा |
| **Course Code** | : MAR-354- MJE (B) |
| **No. of Lectures** | : 60 |
| **No. of Credits** | : 04 |

## Course Objectives:

१) बालकथेचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
२) बालकथेची वैशिष्ट्ये सांगता येतील.
३) बालकथेच्या भाषाची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.
४) बालकथेची वाटचाल अभ्यासणे.
५) 'घाणेरीची फुले' या कलाकृतीचा अभ्यास करणे.
६) 'घाणेरीची फुले' या कलाकृतीचे मूल्यमापन करणे.
७) 'घाणेरीची फुले' या कलाकृतीचे वेगळेपण स्पष्ट करणे.
८) बालमनाशी सुसंवाद करण्याची, त्यांना समजून घेण्याची कला समजावून सांगणे.

## Course Outcomes:

CO1. बालकथेचे स्वरूप समजेल.
CO2. विद्यार्थी बालकथेतील भाषेची वैशिष्ट्ये विशद करतील.
CO3. बालकथेच्या विकासाची/वाटचालीची माहिती होईल.
CO4. कलाकृतीचा आशय आणि रचना समजेल.
CO5. कलाकृतीचे कलात्मक आणि नैतिक मूल्यमापन करू शकतील.
CO6. नेमलेल्या कलाकृतीचा वाङ्मयीन अभ्यास होईल.
CO7. कलाकृतीचे वेगळेपण लक्षात येईल.
CO8. बालमनाशी सुसंवाद साधण्याची व समजून घेण्याची कला आत्मसात करतील.

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **बालकथा या वाङ्मय प्रकाराचे तात्विक विवेचन**<br>१.१ बालकथा वाड्मय प्रकार-स्वरूप व संकल्पना<br>१.२ बालकथा वाड्मय प्रकारचे वेगळेपण | ६० |
| २ | **बालकथा  साहित्य प्रकार- मूलतत्त्वे**<br>२ १.बालकथा  वाङ्मय प्रकाराची प्रेरणा<br>२ २.बालकथा  वाङ्मय प्रकाराचे घटक<br>२ ३.बालकथा  वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये | |
| ३ | **बालकथा साहित्यप्रकार- वाटचाल**<br>२ १ .बालकथा वाड्मय प्रकाराची वाटचाल | |
| ४ | **नेमलेल्या साहित्यकृतीचा अभ्यास (बालकथा)**<br>४ १.‘घाणेरीची फुले’- प्रा. रामनाथ चव्हाण, अनुबंध प्रकाशन, प्रथमावृत्ती, सप्टेंबर २०१२ | |
| ५ | **‘घाणेरीची फुले’ या साहित्यकृतीचे वाड्मयीन मूल्यमापन**<br>५.१  पात्रपरिचय<br>५.२ घटना- प्रसंग<br>५.३ भाषासौंदर्य | |
| ६ | **‘घाणेरीची फुले’ या साहित्यकृतीचे वेगळेपण**<br>६.१. ‘घाणेरीची फुले’ बालकथेची  शैली<br>६.२. ‘घाणेरीची फुले’ बालकथेची  वैशिष्ट्ये<br>६.३ .लेखकाचा संशोधकीय दृष्टिकोन | |

**संदर्भग्रंथ-**

(१) ‘घाणेरीची फुले’- प्रा. रामनाथ चव्हाण, अनुबंध प्रकाशन प्रकाशन, प्रथमावृत्ती,  सप्टेंबर २०१२
(२)  देशमुख के.एस., आपले डाकघर
(३) डॉ.शाह सुलभा, मराठी बालसाहित्य : स्वरूप आणि अपेक्षा
(४) दांडेकर मालतीबाई,बालसाहित्याची रूपरेखा, मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई
(५) बाबा भांड, श्रेष्ठ भारतीय बालकथा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद
(६) बाबा भांड, नीतिकथा
(७) किणीकर अनिल, पंचतंत्रातील गोष्टी (भाग १ ते ४)

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)
(As Per NEP 2020)

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: **T.Y.B.A. (SEM V)** **Subject**: MARATHI

**Course**: Major Elective (Theory) **Course Code**: MAR-354- MJE (B)

**Tittle of Course :** मराठी साहित्य – बालकथा

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | **Programme Outcomes (POs)** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 |
| CO 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 8 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 |

**Justification for the mapping**

**PO1: Critical and Creative Thinking:**

CO5: . कलाकृतीचे कलात्मक आणि नैतिक मूल्यमापन करताना विद्यार्थी सौंदर्यदृष्टी, विवेकबुद्धी आणि सर्जनशील विचार करतील.

**PO2: Communication Skill:**

CO8 : विद्यार्थी बालकांच्या विचारविश्वाशी संवाद साधू शकतील, त्यांच्या भावना, भाषा आणि विचार समजून घेण्याची संवेदनशीलता विकसित करतील.

**PO3: Multicultural Competence:**

CO3: कलाकृतीचे वेगळेपण लक्षात येऊन विविध संस्कृती, परंपरा आणि कलाभिव्यक्तींचा आदरपूर्वक आणि तुलनात्मक अभ्यास करतील

**PO4: Research Skills:**

CO4: कलाकृतीचे विश्लेषण करताना विद्यार्थी आशय, रचना, तंत्र आणि संदेश यांचा सखोल अभ्यास करतील. व त्यातून संशोधन दृष्टिकोन विकसित होईल.

**PO5: Environmental awareness:**

CO3. बालकथांमध्ये समाज आणि पर्यावरणाशी जोडलेले विषय वारंवार येतात — निसर्ग, प्राणी, संवेदना, आणि मूल्ये त्यामुळे विद्यार्थ्यांची पर्यावरण-जाणीव विकसित होईल.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO7: बालकथेतील भाषेचे विश्लेषण करताना विद्यार्थी भाषा वापरातील विविधता समजून घेतात, तर्कशक्ती वापरून भाषेचे स्वरूप आणि परिणाम शोधतील.

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO5. कलाकृतीचे मूल्यमापन करताना विद्यार्थ्यांनी विविध दृष्टिकोन ऐकणे, चर्चा करणे, आणि सहमत निष्कर्ष काढणे याद्वारे सहकार्य विकसित होईल.

**PO8: Value inculcation:**

CO1 बालकथा केवळ मनोरंजनासाठी नसून, मूल्यवर्धनासाठी देखील असते. त्यामुळे तिचे स्वरूप समजणे विद्यार्थ्यांना नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्य आत्मसात करण्यास मदत करते.

**PO9: Digital and technological skills:**

CO6. वाङ्मयीन अभ्यास करताना डिजिटल साधनांचा वापर करून विद्यार्थी सखोल संशोधन, तुलना, टिपण आणि सादरीकारणासाठी तंत्रज्ञान कौशल्यांचा वापर करतील.

**PO10: Community Engagement and Service:**

CO8. बालकथेचा अभ्यास करताना नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक मूल्य समजून घेता येतात.

-----------------------------------------------------------------------------------------------------

## CBCS Syllabus as per NEP 2020 for T.Y.B.A Marathi (2023 Pattern)

| | | |
|---|---|---|
| Name of the Programme | : | B.A. |
| Programme Code | : | UAMAR |
| Class | : | T.Y.B.A. |
| Semester | : | VI |
| Course Type | : | Minor |
| Course Name | : | मराठी साहित्य : विज्ञान कादंबरी |
| Course Code | : | MAR -361-MN |
| No. of lectures | : | 60 |
| No. of Credit | : | 04 |

### A) Course Objectives:

1. तृतीय वर्ष कला या वर्गाच्या विद्यार्थ्यांना मराठी विज्ञान साहित्याची ओळख करून देणे.
2. मराठी विज्ञान कादंबरी व साहित्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये रुची निर्माण करणे.
3. विज्ञान कादंबरीच्या अभ्यासातून वैज्ञानिक सिद्धांत व संकल्पना लक्षात आणून देणे .
4. विज्ञान आणि साहित्य यामधील नाते सांगून जीवन विषयक समज विकसित करणे.
5. विज्ञान कादंबरीतील विविध प्रवाह आणि प्रवृत्तींचा परिचय करून देणे.
6. विद्यार्थ्यांवर कादंबरीच्या माध्यमातून जीवनमूल्यांचे सुसंस्कार घडविणे.
7. सद्यकालीन प्रसार माध्यमांवरील विज्ञान कादंबरी स्वरूप कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात आणून देणे .

### Course Outcomes:

CO .1 विज्ञान कादंबरी साहित्यप्रकाराचे आकलन होईल .
CO . 2 विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाज यातील परस्परसंबंध समजेल.
CO.3 विद्यार्थ्यांना विज्ञान कादंबरीचे वगळेपण लक्षात येऊन वाङ्मयीन अभिरुचीचा विकास होईल.
CO4 विज्ञान साहित्याविषयी प्रेम निर्माण होऊन वैज्ञानिक दृष्टीकोण विकसित होईल.
CO5 वैज्ञानिक संकल्पना कादंबरीच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्ये विकसित होईल.
CO6 विद्यार्थ्यांची विज्ञान कादंबरी वाचन, लेखन व सादरीकरणाची क्षमता वाढेल .
CO7 . विज्ञान कादंबरी आविष्काराचे तंत्र अवगत होईल .

## Topics and Learning Points

| घटक | तपशील | तासिका |
|---|---|---|
| १ | **विज्ञान कादंबरी या वाड्मय प्रकाराचे तात्त्विक विवेचन :**<br>१.१. विज्ञान कादंबरी : संकल्पना व स्वरूप<br>१.२. विज्ञान कादंबरी : साहित्यप्रकाराची वाटचाल<br>१.३. विज्ञान कादंबरीचे घटक व वैशिष्ट्ये | ६० |
| २ | **विज्ञान कादंबरी साहित्य प्रकार- मूलतत्त्वे**<br>२ १.विज्ञान कादंबरी वाङ्मय प्रकाराची प्रेरणा<br>२ २.विज्ञान कादंबरी वाङ्मय प्रकाराचे घटक<br>२ ३.विज्ञान कादंबरी वाङ्मय प्रकाराची वैशिष्ट्ये | |
| ३ | **विज्ञान कादंबरी : वाटचाल**<br>३.१ विज्ञान कादंबरीची ऐतिहासिक पार्श्वभूमी | |
| ४ | **नेमलेल्या साहित्यकृतीचा अभ्यास**<br>**४.१. 'एक होता कार्व्हर' कादंबरी , लेखक- विना गवाणकर** | |
| ५ | **एक होता कार्व्हर एक होता कार्व्हर या साहित्यकृतीचे वाड्मयीन मूल्यमापन**<br>५.१. पात्र परिचय<br>५.२. घटना -प्रसंग<br>५.३ भाषा सौंदर्य | |
| ६ | **एक होता कार्व्हर या कादंबरीचे वेगळेपण**<br>६.१. वैज्ञानिक जाणिवा<br>६.१. वैशिष्ट्ये<br>६.३ लेखकाचा संशोधकीय दृष्टिकोन कादंबरीची भाषा शैली | |

**संदर्भ ग्रंथ-**


1. एक होता कार्व्हर – वीणा गवाणकर
2. मराठी कादंबरी – चंद्रकांत बांदिवडेकर
3. मराठी कादंबरीची स्थिती गती – अंजली सोमण
4. मराठी विज्ञान कादंबरीतील समाज जीवन - डॉ. वंदना लव्हाळे
5. मराठी विज्ञान कादंबरीतील संकल्पना आणि भाषणशैली – जयंत नारळीकर
6. मराठी साहित्यातील विज्ञान कादंबरी एक : चिकित्सक अभ्यास – डॉ. जयश्री सातोरकर
7. निवडक विज्ञान कथा कादंबरीकार – जयंत नारळीकर
8. विज्ञान आणि अध्यात्म : मूळापासून दृष्टिक्षेप – वि. शं. ठकार


****************

Choice Based Credit System Syllabus (2023 Pattern)

(As Per NEP 2023 )

**Mapping of Program Outcomes with Course Outcomes**

**Class**: TYBA (Sem-VI) **Subject**: MARATHI

**Course**: Theory **Course Code**: MAR-**361**-MN

**Title of Course :** मराठी साहित्य :विज्ञान कादंबरी

**Weightage**: 1= weak or low relation, 2= moderate or partial relation, 3= strong or direct relation

| | Programme Outcomes (POs) | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Course Outcomes** | PO 1 | PO 2 | PO 3 | PO 4 | PO 5 | PO 6 | PO 7 | PO 8 | PO 9 | PO 10 |
| CO 1 | 3 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 2 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 |
| CO 4 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| CO 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 |
| CO 7 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 3 | 1 |
| CO 8 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | | 1 | 1 | 1 |

**Justification for the mapping**

**PO1: Critical and Creative Thinking:**

Co1: विद्यार्थ्यांना मराठीमध्ये विज्ञानाची माहिती कशी मांडली जाते ते समजेल.

**.PO2: Communication Skill:**

co 4 विद्यार्थ्यांना मराठीतील विज्ञान कादंबरीची साहित्याची महत्त्वाची ओळख व्हावी.

**PO3: Multicultural Competence:**

Co4 : विद्यार्थ्यांना कथानकातून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र किंवा इतर वैज्ञानिक संकल्पना समजतील.

**PO4: Research Skills:**

CO2 : विज्ञानाचे तत्त्व आणि सिद्धांत कादंबरी किंवा साहित्यिक वर्णनांद्वारे समजावले जातील. होईल.

**PO5: Environmental awareness:**

CO1 : विज्ञान कादंबरीतील मुख्य प्रवाह (उदा. कल्पनारम्य विज्ञान, सामाजिक विज्ञान कल्पना, तांत्रिक विज्ञान आधारित कथा) ओळखता येतील.

**PO6: Problem-solving Abilities:**

CO2: कादंबरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्यांचे सुसंस्कार आणि नैतिक विचार विकसित करणे. .

**PO7: Collaboration and Teamwork:**

CO7 : सद्यकालीन प्रसार माध्यमांवरील विज्ञान कादंबरी स्वरूप कार्यक्रमांचे स्वरूप विद्यार्थ्यांना लक्षात आणून देणे, म्हणजे त्यांना आधुनिक माध्यमांत विज्ञान साहित्याची मांडणी कशी होते हे समजावे.

**PO8: Value inculcation:**

CO3 : विज्ञानककादंबरीच्या माध्यमातून विविधसुदृढ समाज . निर्मितीच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची गोष्ट लक्षात येईल .

**PO9: Digital and technological skills:**

: CO7: विज्ञान कादंबरीचे विविध माध्यमांवर सादरीकरणतंत्रज्ञान आणि इंटरनेट बाबत कथेतून .अभिवाचन करता येईल/ .विविध विचारांचे प्रकटीकरण कथेच्या माध्यमातून करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करता येईल .मार्गदर्शन करता येईल

**PO10: Community Engagement and Service:**

CO6 : विविध कादंबरी व वाचनामुळे विध्यार्थ्यांची कथावाचन, लेखन व सादरीकरणाची क्षमता वाढेल .
विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या वैज्ञानिक ज्ञानाचा, कौशल्याचा वापर वैयक्तिक व व्यावसायिक पातळीवर करता येईल.

## CBCS Syllabus as per NEP 2020 for TYBA Marathi (2024 Pattern)

**Name of the Programme** : B.A.
**Program Code** : UAMAR
**Class** : T.Y.B.A.
**Semester** : VI
**Course Type** : On Job Training (OJT) (Practical)
**Course Name** : On Job Training (OJT)
**Course Code** : MAR -385- OJT
**No. of Lectures** : 60
**No. of Credits** : 04

## Course Objectives:

१. शैक्षणिक ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करणे.
२. संकलन, विश्लेषण व संशोधन कौशल्ये विकसित करणे.
३. शैक्षणिक व सामाजिक संस्था समाज माध्यमे कम्युनिटी रेडिओ इ. च्या कार्याची ओळख करून घेणे.
४. सेवाभावी संस्थाव सामाजिक बाधिलकी जपणाऱ्या संस्थांचा परिचय करून घेणे.
५. भाषेच्या व कौशल्याधिष्ठीत ज्ञानाच्या सामर्थ्यावर प्रकल्प लेखन कौशल्ये विकसित करणे.
६. प्रत्यक्ष स्थल, क्षेत्र भेटीचा अनुभव घेऊन तेथील कामकाजाची व्यवस्था समजून घेऊन प्रशिक्षण घेणे.
७. प्रत्यक्ष विविध सेवाभावी संस्थांच्या कार्याचा आढावा घेऊन निष्कर्ष काढण्याचे कौशल्ये विकसित करणे.

## Course Outcomes:

CO1: विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करण्याची संधी मिळेल.
CO2: विद्यार्थ्यांना प्रशिक्षणात मिळविलेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व संशोधन करण्याचे कौशल्ये विकसित होतील.
CO3: विद्यार्थ्यांना शैक्षणिक व सामाजिक संस्था, समाज माध्यमे कम्युनिटी रेडिओ इ.च्या यांच्या कार्याची ओळख होईल.
CO4: विद्यार्थ्यांना सेवाभावी संस्थाव सामाजिक बाधिलकी जपणाऱ्या संस्थांचा परिचय होईल.
CO5: विद्यार्थ्यांना व्यावसायिक काम करण्याची शिस्त, व्यवस्थापन, प्रकल्प नियोजन, यासारख्या कौशल्यांचा विकास होईल.
CO6: विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्थल, क्षेत्र भेटीचा अनुभव घेऊन तेथील कामकाजाची व्यवस्था समजून घेऊन प्रशिक्षण घेता येईल.
CO7: विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विविध सेवाभावी संस्थांच्या कार्याचा आढावा घेऊन निष्कर्ष काढण्याचे कौशल्ये विकसित होईल.

**टीप- विद्यार्थी प्रत्यक्ष** On Job Training (OJT) (Practical) **घेऊन मराठी विभागामध्ये विहित नमुन्यात अहवाल सदर करतील.**

**The Department will Follow the SOPs and Guidelines prepared by the college in this regard**